श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नीत

शहीद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित



# शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय

## तिटवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर



## - Our Courses -

1. Bachelor of Computer Application.
2. BSc Information Technology.
3. BSc Microbiology.
4. BSc Food Science.
5. B.A. Mass Media.
6. MSc. Chemistry
7. MSc. Computer Science.
8. MSc. Microbiology.
9. DMLT. (Diploma in Medical Lab Technology)

## माहिती पुस्तिका



**खास वैशिष्ट्ये-**

१. परिसरातील एकमेव महिला महाविद्यालय.
२. तज्ज्ञ प्राध्यापक.
३. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय शिक्षण.
४. SC/ST विद्यार्थिनींना १००% फी माफ.
५. Open /OBC विद्यार्थिनींना ५०% शैक्षणिक फी माफ.
६. कॉलेज बसची सुविधा.
७. प्रोजेक्टरसह सुसज्ज क्लासरूम.

## ११० गावातील ८०० विद्यार्थिनींची पहिली पसंद


+91-7218180066
+91-9423052452

तिटवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
www.svlm.in

**Shahid Shikshan Prasarak Mandal received**

## Positivity Gems of India Award

in 2nd National Summit on Leadership in Positivity 2022 by the hands of Air Marshal Hon Ajit Bhonsle.






गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते
शिक्षणतज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांना
हिरोजी इंदुलकर स्मृती पुरस्कार प्रदान...!




नेहरू युवा केंद्र ,कोल्हापूर
आयोजित
जिल्हा स्तरीय युवा महोत्सव
प्रथम क्रमांक

कोल्हापूर –सांगली –सातारा
या तीन जिल्ह्यातील
जिल्हास्तरीय डान्स स्पर्धेमध्ये
द्वितीय क्रमांक





शिवजयंती









NSS -2022-24-Chandre-Awareness Rally

Karate competition





NSS -2022-24-Chandre



NSS -2022-24-Chandre-Tree Plantation




NSS -2022-24-Chandre-Blood Donation



Rangoli Competition

# Placement-2022-23

## TATA Moters



सानिका जाधव
कावणे

राजनंदिनी जठार
वाघापूर

वैष्णवी पाटील
वडकशिवले

सृष्टी कोठावळे
म्हाळुंगे

साक्षी पाटील
केंबळी

सुहानी पाटील
कावणे

## UPCON



सलोनी पाटील
ठिकपुर्ली

पायल सुतार
सावर्डे पाटण

नेहा पोतदार
नरतवडे

## LATA SOFTWARE & CONSULTANCY



चिन्मयी मेंगाणे
चंद्रे

अमृता पाटील
तिटवे

सानिका रणदिवे
राशिवडे

## TE CONNECTIVITY



शीतल साठे
सरवडे

दिपाली पाटील
आम.व्हरवडे

प्रतीक्षा तोरगल
चंदगड

अश्विनी नांदवडेकर
चंदगड

श्वेता कांबळे
सरवडे

धनश्री राजीगरे
सरवडे

## ICICI



निकिता पाटील
तिटवे

साक्षी पाटील
भाटणवाडी

प्रज्ञा पाटील
भाटणवाडी

सानिका चौगले
बिद्री

समीक्षा कांबळे
अर्जुनवाडा

सायली ताटे
कोल्हापूर

## Altwise



गायत्री सुतार
गुडाळवाडी

साक्षी सुतार
नरतवडे

## INDOSOFT



पल्लवी कासार
ठिकपुर्ली

प्राची कासार
ठिकपुर्ली

## ICICI



आकांक्षा आनाजेकर
आनाजे

## PUNE POLICE



सरस्वती टिंगे
कुपलेवाडी

## Mumbai POLICE



ऋतुजा साळोखे
अर्जुनवाडा

**१०० हून अधिक विद्यार्थीनींना**

**TCS ,Infosys सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये Placement देणारी**

**जिल्ह्यातील एकमेव संस्था...!**




## वैशिष्ट्ये

- परिसरातील एकमेव महिला महाविद्यालय
- गरजू व हुशार विद्यार्थीनींसाठी फी सवलत व कर्ज योजना
- तज्ञ प्राध्यापक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक
- प्रोजेक्टरसह सुसज्ज स्मार्ट क्लासरूम
- सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात सी.सी.टी.व्ही. सुविधा
- कॉलेज बसची सुविधा

**SC/ST विद्यार्थ्यांनीना १००% शैक्षणिक की माफ**

**OPEN/ OBC विद्यार्थिनींना ५०% शैक्षणिक फी माफ**

Scan for Address



Design-V@!bhav-7030901560

## Institute Vision

To impart quality education to rural women in order to face global challenges and to empower them with changing technology, to make the institution and esteemed center of higher education and research in the context of the new education policy 2020 and global knowledge competition and to contribute to the sustainable development of the society.

## Institute Mission

- To develop high quality education institution with technical academic excellence, innovative research and development programs with core human values.
- To expose latest technologies to students through carefully designed training modules in collaboration with alumni and industries.
- To encourage faculty and students to collate, generate innovative ideas and preserve the knowledge to the benefit of society.
- To groom students with high professional and ethical standard.
- To promote co-and extra-curricular activities for over-all personality development of the students.

# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी विद्यापीठ) हे भारतातील एक महिला विद्यापीठ आहे. याची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. एसएनडीटीची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. या विद्यापीठाशी संबंधित सगळी महाविद्यालये 'एसएनडीटी कॉलेज' म्हणून ओळखली जाऊ लागली.

डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल काँग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद) अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, इ.स. १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. इ.स. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतीय  महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसींनी या विद्यापीठाला १५ लाख रुपयांची देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे झाले.

इ.स. १९५१ साली या विद्यापीठाला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली. इ.स. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात एक वेगळे कलम (क्रमांक १०५) केवळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी आहे. या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात.

इ.स. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहाद्दुर झवेरी यांनी कुलगुरुपद सांभाळले व यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी. या शेवटच्या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड नुट्रिशियन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. १९७१ ते १९७५ या काळात आणखी ११ विभागांची भर पडली आणि शिवाय पुण्यात एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही स्थापन झाले.

भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग आहेत. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुद्धा आहेत.

इ.स. १९७४ साली डॉ. नीराबेन देसाईच्या मार्गदर्शनाखाली Research Centre for Women's Studies स्थापन झाले. या केंद्राला आंतरराष्ट्रीय मान्यता आहे. १९७५ ते १९८५ या  दशकात विद्यापीठाने आणखी तेरा नवीन पदव्युत्तर विभाग (त्यामध्ये Communication Media for Children सारखे नावीन्यपूर्ण

काम करणारे विभाग आहेत), पॉलिटेक्निक, फार्मसी महाविद्यालय आणि दूरस्थ शिक्षण केंद्र (१९७९) स्थापन झाले. १९८५ नंतरच्या तीन दशकात बारा नाविन्यपूर्ण विभाग आणि संस्थांची स्थापना झाली. यात व्यवस्थापन संस्था, (मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट), तंत्रशास्त्र संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) रसायनशास्त्र, भूगोलशास्त्र, समाजकार्य संगणकशास्त्र (कंप्युटर सायन्स) न्यायशास्त्र, ज्वेलरी डिझाइन अशा अनेक संस्था आहेत. त्यांपैकी महर्षी कर्वे मॉडेल कॉलेज फॉर विमेन हे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे २०११ साली स्थापन केलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात B.C.A. आणि B.Com हे अभ्यासक्रम चालतात. २०१२-१३ या वर्षापासून सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमात (मास्टर्स डिग्री) इंटर्नशिप आणि संशोधन हे दोन प्रत्येकी आठ क्रेडिट कोर्सेस प्रत्येक विद्यार्थिनीसाठी आवश्यक ठरवले गेले. Internship मुळे विद्यापीठ ७५०-८०० संस्थांशी जोडले गेले, विद्यार्थिनींना Placement च्या अनेक संधी उपलब्ध झाल्या.

महर्षी कर्वे यांनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर आणि अशा अनेक स्त्रियांनी स्वतःचे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेतले. M.Com. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णतः ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून M.A. in Educ अभ्यासक्रमही पूर्णतः ऑनलाइन केला जाणार आहे.

## शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, तिटवे

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना दर्जेदार शिक्षण मिळावे व या भागातील विदयार्थी जागतिक दर्जाचे घडावेत या उद्देशाने शहीद शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सन २००८ साली झाली. राधानगरी हा निसर्गसौंदर्याने नटलेला पण दुर्गम व डोंगराळ तालुका. या तालुक्यात हजारो आजी - माजी सैनिक आहेत. या सैनिकांची मुले विषेशतः मुलींना उच्चतम दर्जाचे शिक्षण मिळविण्यात अनेक अडचणी होत्या व आहेत. जिल्हयामधील १४८ सैनिक शहीद झालेले आहे. त्यांच्या पाल्यांचीही शिक्षणासाठी वणवण सुरू आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून येथील विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून शिक्षण क्षेत्रातील पोकळी भरून काढण्याच्या उदात्त हेतूने तिटवे येथील वीरपत्नी लक्ष्मीबाई पाटील व आंतर राष्ट्रीय उच्च शिक्षण गुणवत्ता वाढ संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील यांनी १९७१ च्या भारत पाक युध्दात शहीद झालेले सिताराम गोपाळा पाटील यांच्या प्रेरणेने शहीद शिक्षण प्रसारक मंडळांची स्थापना केली. सन २००९ मध्ये शहीद पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या रूपाने आम्ही शैक्षणिक वाटचालीचा श्री गणेशा केला. प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सुरू असलेल्या या शाळेत सध्या पंचक्रोषीतील बरोबरच जिल्हयाबाहेरील विदयार्थीही ज्ञानार्जनाचे काम करत आहेत. विदयार्थ्यांच्या शैक्षणिक, शिक्षणोत्तर, क्रीडा व सांस्कृतिक गरजांची पुर्तता करून त्यांचा सर्वांगीण विकास साधून अत्युच्च दर्जाची कामगिरी करण्यासाठी विदयार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहित केले जाते आजपर्यंत भारताचे राजनैतिक अधिकारी, परराष्ट्र सचिव मा. ज्ञानेश्वर मुळे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विषेश पोलिस महानिरीक्षक मा. विश्वास नांगरे पाटील, कोल्हापूरचे उपजिल्हाधिकारी मा. अशोक पाटील, लाचलुचपत विभागाचे पोलिस अधिक्षक मा. डॉ. दिगंबर प्रधान, निवृत्त ब्रिगेडीयर मा. यु.डी. थोरात, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सुभाष सासने, स्कॉटलंड येथील उदयोजक मा. विश्वास शिंदे, ऑस्ट्रेलिया विदयापीठातील मा. अरूण पाटील, आदि मान्यवरांनी शाळेस वेळोवेळी भेट देऊन विदयार्थ्यांना प्रोत्साहन व

मार्गदर्शन केले आहे. मुल्य शिक्षणाचे सिध्दांत विदयार्थ्यांच्या मनावर बिंबवून भविष्यात विकसित भारताचे आदर्श नागरिक घडवणे, मायबोली मराठी बरोबरच जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी या दोन्हीं भाषांचा विकास करणे, विदयार्थ्यांची क्षमता व सुप्त शक्ती ओळखून त्यांच्यातील नैसर्गिक कलागुणांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण व सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक दृष्ट्या वंचित घटकांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार करणे, क्रीडा प्रकारांत त्यांना प्रशिक्षित करणे या उद्देषाने संस्थेची वाटचाल सुरू आहे.

गेल्या आठ-दहा वर्षात संस्थेने आर्थिक दृष्ट्या गरजू व गुणवंत अनेक विदयार्थ्यांचे पालकत्व स्विकारले आहे, यातूनच कु. कोमल घारे ही वैदयकीय शिक्षण घेत असून कु. श्वेता घारे इंजिनीअरींगची पदविका घेऊन स्वबळावर कुटूंबाला मदत करत आहे. संस्थेमार्फत अनेकांना विनातारण कर्जपुरवठा करून दर्जेदार शिक्षणाची दारे खुली केली आहेत. या योजनेचा लाभही अनेकांनी घेतला आहे. प्रारंभी पासूनच संस्थेने परिसरातील विदयार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा दिल्या आहेत. या शाळेतील विदयार्थी भविष्यात जगभरातील शेकडो देशांमध्ये भारताचे नाव उज्वल करावेत. नोबेल, ऑस्कर, ऑलपिंक सारख्या पदकांचे दावेदार ठरावेत अशा प्रकारचे ध्येय बाळगून संस्था वाटचाल करीत आहे. त्यामुळे अल्पावधीतच संस्थेचे नाव पश्चिम महाराष्ट्रात दूरवर पसरले आहे. शिक्षणाने माणूस समृद्ध होतो त्याच्या बुद्धीच्या कक्षा रुंदावतात महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे स्वप्न पाहीले आणि त्यातूनच श्रीमती नाथीबाई ठाकरची महिला विद्यापीठाची स्थापना झाली.अशा पार्श्वभूमीवर एसएनडीटी विद्यापीठाच्या संलग्नित शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयाची स्थापना २०१८ मध्ये झाली.शहीद सिताराम गोपाळ पाटील जे १९७१ च्या बांगलादेश युद्धात शहीद झाले आणि त्यांच्या प्रेरणेतूनच शहीद शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना २००७ मध्ये झाली.या कॉलेजचे मुख्य मार्गदर्शक जागतिक शिक्षणतज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील सर आहेत.

हिरव्यागार परिसरात डोंगराच्या कुशीत राधानगरीच्या पदराआड शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय वसले आहे.महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांना पारंपारिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक शिक्षण मिळावे या उद्देशाने येथे २०१८ मध्ये बीसीए म्हणजेच बॅचलर ऑफ कम्प्युटर सायन्स, बीएएमएम म्हणजेच बॅचलर ऑफ मास मीडिया या दोन कोर्सेस पासून सुरुवात झाली. बीएससी मायक्रोबायोलॉजी, बीएससी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, या कोर्सेसची सुरुवात २०१९ मध्ये झाली.२०२१ मध्ये बीएससी फूड सायन्स अँड न्युट्रिशियन एमएससी कम्प्युटर सायन्स ची सुरुवात करण्यात आली आणि २०२२ मध्ये एमएससी मायक्रो बायोलॉजी व एम एस सी केमिस्ट्री या कोर्सेस ची सुरुवात करण्यात आली. या महाविद्यालयाची साठ विद्यार्थिनींच्या पासून सुरुवात झाली आणि आता नऊशेहून अधिक विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

❖❖❖

# महाविद्यालयातील सोयी सुविधा

शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय सुंदर, निसर्गरम्य परिसरामध्ये वसलेले आहे. भव्य अशी इमारत, स्वतंत्र ग्रंथालय आणि अभ्यासिका , जिमखाना याकरिता स्वतंत्र इमारती, भव्य क्रिडांगण, अत्याधुनिक साहित्य, विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वसतिगृह व सभागृह आहे.

## १. ग्रंथालय (Library) –

महाविद्यालयाचे वैभव आणि अभिमान असलेले कै. सीताराम गो. पाटील ग्रंथालय स्वतंत्र इमारतीत असून दहा लाखांहून अधिक रुपये किंमतीची अशी ग्रंथसंपदा आहे . अत्यंत दुर्मिळ ग्रंथ, क्रमिक, संदर्भ, अभ्यासपूरक, सामान्यज्ञान आणि विविध विषयांचे संशोधनात्मक जर्नल्स यांचा यात समावेश आहे. देवघेव विभागातून विद्यार्थिनीस ग्रंथालय कार्ड च्या आधारे एक पुस्तक आठवड्यासाठी मिळते. विद्यार्थिनीने महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्वरीत प्रवेश पावती ग्रंथालयामध्ये दाखवून त्या ठिकाणाहून ओळखपत्र घ्यावे. ग्रंथालयातून पुस्तके घेताना विद्यार्थिनींकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींनी ग्रंथालयाचे नियम पळून ग्रंथालयाचा जास्तीत जात उपयोग करून घ्यावा. विद्यार्थिनीसाठी अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. या अभ्यासिकेमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींखेरीज अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

## २. प्रयोगशाळा (Laboratories)-

सर्व विज्ञान विभागांना पुरेशा प्रयोगशाळा सुविधा पुरविल्या जातात. प्रयोगशाळा प्रशस्त, सुनियोजित आणि विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहेत. वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळा आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहेत. विद्यार्थ्यासाठी इंग्रजी विभागातील भाषा प्रयोगशाळा उपलब्ध आहे. पर्यावरण शास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. भौतिकशास्त्र विभागाशी एक मटेरियल सायन्स रिसर्च लॅब संलग्न आहे. कॉलेजमध्ये इंटरनेट कनेक्शन सुविधांसह नव्याने नूतनीकरण केलेली अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा आहे. प्रयोगशाळेत विशेषत: विद्यार्थ्यांनिंच्या वापरासाठी अत्याधुनिक कॉन्फिगरेशनसह १०० वैयक्तिक संगणक आहेत. प्रयोगशाळा स्कॅनिंग आणि प्रिंटिंग सुविधांनी सुसज्ज आहे. महाविद्यालयात ओव्हरहेड प्रोजेक्टर, ऑडिओ उपकरणे, टेलिव्हिजन आणि अशी इतर उपकरणे देखील आहेत जी सहसा शिकवण्याच्या प्रक्रियेत वापरली जातात. प्रयोगशाळेची देखरेख एका पात्र अध्यापन सहाय्यकाद्वारे केली जाते जो तांत्रिक सहाय्य देखील प्रदान करतो.

## ३. रेमेडियल कोर्स (Remedial Courses)-

काही विद्यार्थिनींना गणित, इंग्रजी किंवा यासारखा एखादा तांत्रिक विषय कठीण वाटतो. इतर विद्यार्थ्यांनींच्या तुलनेत त्यांची प्रगती असमाधानकारक असते. अशा विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने रेमेडीयल कोर्सेस सुरु केले आहेत.

## ४. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (Competitive Exam Center)-

स्पर्धेच्या युगात शहीद शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या विद्यार्थिनींनी चांगली प्रगती करावी म्हणून महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र नाममात्र फी घेऊन चालवले जाते. विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेचे अचूक मार्गदर्शन व्हावे यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या कडूनही विद्यार्थिनींनीना मार्गदर्शन केले जाते.

## ५. राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)-

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेची सोय असून विद्यार्थिनींची निवड करताना समाज सेवेची आवड व सामाजिक बांधिलकीची जाण असणाऱ्या मुलींना यात प्रवेश दिला जाईल. योजनेमार्फत आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहणे सक्तीचे आहे. त्यासाठी विद्यार्थिनींना नोंदणी शुल्क भरावे लागते.

## ६. जिमखाना (Gymkhana)-

महाविद्यालयीन विद्यार्थिनींना खेळाची आवड निर्माण व्हावी तसेच सांघिक वृत्ती वाढीस लागावी यासाठी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण परिसरात सर्व प्रकारच्या खेळासाठी भरपूर जागा उपलब्ध असून मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ क्रीडा शिक्षक कार्यरत आहेत.

## ७. पर्यावरण (Environment Committee)

पर्यावरण हा आज परवलीचा शब्द बनला आहे. सुशिक्षित व अशिक्षित या दोहोंचाही पर्यावरणाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध येतो पर्यावरणाचा ढासळणारा समतोल सावरण्यासाठी समाज जागृती आवश्यक ठरते व यामध्ये लोकांचे योगदान अत्यंत महत्वाचे ठरते म्हणून महाविद्यालयांत एक पर्यावरण जागृती मंडळ स्थापन केलेले आहे. या मंडळामार्फत पर्यावरण विषयक व समाजाभिमुख असे अनेक उपक्रम राबवले जातात. या मध्ये महाविद्यालयाच्या युवतींना सहभागी होता येते.

## ८. कँटीन

शहिद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, तिटवे यांचे कॅम्पसमध्ये प्रशस्त कॅन्टीन आहे. महाविद्यालय विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांना कॅन्टीनची सुविधा देत आहे; हे विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यास सक्षम आहे आणि एका वेळी ४० लोकांना सामावून घेऊ शकते. त्यात प्रशस्त आणि व्यवस्थित देखभाल केलेली खोली तसेच स्वयंपाकघर आहे; सामान्यत: कॉलेज कोणत्याही व्यक्तीला योग्य अधिकार्यांच्या औपचारिकतेनंतर कराराच्या आधारावर ते प्रदान करते कॉलेज कॅन्टीन सेमिनार, कॉन्फ्फ्ररन्स आणि कार्यशाळा यांसारख्या महाविद्यालयीन कार्यक्रमांमध्ये आयोजित कार्ये देखीलपूर्ण करते. आमच्या कॅम्पस कॅन्टीनमध्ये किचन कर्मचारी विद्यार्थी आणि कर्मचारी यांना पौष्टिक आणि आरोग्यदायी अन्न पुरवण्याची काळजी घेतात. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था असून स्वच्छता राखली जाते. कॅन्टीन सर्व कामकाजाच्या दिवसात उघडी राहते. हे विद्यार्थी, कर्मचारी आणि अभ्यागतांना सर्व प्रकारचे पौष्टिक आणि स्वच्छ खाण्यायोग्य पदार्थ आणि पेये प्रदान करते.

## ९. सुसज्ज खेळण्यासाठी मैदान

महाविद्यालयात खालील क्रीडा सुविधा आहेत. व्हॉलीबॉल मैदान - एक, कबड्डी मैदान - ते, बास्केटबॉल - हायड्रोलिक पोलसह सिमेंट कोर्ट, खो-खो मैदान, जंपिंग पिट, कॅरम बोर्ड, बुद्धिबळ शहिद विरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, तिटवे येथील विद्यार्थी कॅम्पसमध्ये उपलब्ध इनडोअर आणि आउटडोअर क्रीडा सुविधा वापरू शकतात. विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाही नियमित अंतराने आयोजित केल्या जातात.

## १०. Smart Classroom

स्मार्ट क्लासरूम या तंत्रज्ञान सहीत वर्गखोल्या आहेत ज्या शिकण्याच्या तंत्रज्ञानाला एकत्रित करून आणि प्राध्यापकांना विविध माध्यमांचा वापर करून शिकवण्याची परवानगी देऊन शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या संधी वाढवतात. सहा वर्गखोल्या स्मार्ट क्लासरूम आहेत. स्मार्ट क्लासरूम खालील गोष्टींनी सुसज्ज आहेत:

- ✓ MIC Cordless with receiver
- ✓ Amplifier
- ✓ System
- ✓ Camera
- ✓ LCD Projector
- ✓ Projector Screen
- ✓ Speakers
- ✓ UPS

## ११. सांस्कृतिक हॉल

महाविद्यालयात व्यावसायिकरित्या तैनात केलेली ध्वनिक प्रणाली आणि सुमारे ५०० लोक बसण्याची क्षमता असलेले एक मोठे इनडोअर सभागृह आहे. कॅम्पस-स्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ऑडिटोरियम एक आनंददायी ध्वनिक प्रणाली आणि सुमारे ५०० लोकांच्या आसनक्षमतेने सुसज्ज आहे. सभागृह प्रशस्त, हवेशीर आणि सुसज्ज हॉल आहेत. परिषदा, कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे नियमित ठिकाण, या सभागृहात शिकण्याची प्रक्रिया वाढविण्यासाठी सर्व सुविधा आहेत आणि दर्जेदार शिक्षणाच्या विविध आवश्यकता पूर्ण करणारी एक विस्तीर्ण जागा आहे. शिक्षणाचा दर्जा वाढवणे हा सभागृहामागील उद्देश आहे. हे शक्य करण्यासाठी सभागृहात एलसीडी प्रोजेक्टर, व्याख्यान देण्यासाठी स्क्रीन अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे आमचे कर्मचारी आणि विद्यार्थ्यना सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची पुरेशी संधी देखील प्रदान करते.

## १२. Sports Room

कॉलेजच्या तळघरात एक स्पोर्टस् रूम आहे जिथे विद्यार्थी टेबल टेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ खेळण्यात

आपला मोकळा वेळ घालवतात. शारीरिक प्रशिक्षक महाविद्यालयाच्या सर्व क्रीडा उपक्रमांचे मार्गदर्शन आणि समन्वय साधतात. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यानी आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय/राज्य/जिल्हा आणि आंतर-महाविद्यालयीन स्तरावर वेगवेगळ्या स्पर्धामध्ये प्रतिनिधित्व केले आहे.

## १३. Conference Room

शहिद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयातील कॉन्फरन्स हॉल प्रशस्त, रुंद आणि उत्तम प्रकाशाने उजळलेला असून शैक्षणिक बैठका, परिसंवाद, कार्यक्रम, अतिथी व्याख्याने आणि कॉर्पोरेट भर्ती प्रक्रिया आयोजित करण्यासाठी एक परिपूर्ण वातावरण तयार केले आहे. कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित केलेल्या कॉन्फरन्सेस, सेमिनार इत्यादींना उपस्थित राहण्यामुळे विद्यार्थ्याना विकसित होत असलेल्या उद्योगाशी सुसंगत राहण्यास मदत होते. अत्याधुनिक कॉन्फरन्स हॉल विद्यार्थी, प्राध्यापक आणि पाहुण्यांना चालू कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यासाठी एक शक्तीशाली शिक्षण वातावरण तयार करते. शहिद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये विद्यार्थ्याना त्यांचे ज्ञान, कौशल्ये आणि प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी पुरेशी संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वोत्कृष्ट सुविधा आहेत.

## १४. Language Lab

महिलांसाठी शहिद विरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय इंग्रजी विभागाद्वारे व्यवस्थापित आणि संचालित केलेल्या भाषा प्रयोगशाळेचा अभिमान बाळगू शकते. प्रयोगशाळेत शिकणाऱ्यांसाठी आठ कन्सोल आणि प्रशिक्षकासाठी मास्टर कन्सोल आहे. कम्युनिकेटिव्ह इंग्लिश व्होकेशनल कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्याना या प्रयोगशाळेचा विशेष उपयोग होतो. भाषा प्रयोगशाळा ही परदेशी भाषा शिकण्यासाठी आधुनिक शिक्षण पद्धतींमध्ये वापरली जाणारी दृकश्राव्य स्थापना आहे. इंग्रजीमध्ये कौशल्ये प्रदान करण्यासाठी ही एक तांत्रिक प्रगती आहे. लॅब इंग्रजी भाषा शिकण्याची प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी एक विशेष परिणाम देणारे आणि कार्यक्षम मार्ग देते.

## १५. इतर उपक्रम (Other Activities)

महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्यातील अन्य कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयांत निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, मेहंदी स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते.

# विविध शिष्यवृत्त्या (Different Scholarships)

### ❖ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती व फ्रीशिप:

महाराष्ट्र शासनाच्या सा. न्यायविभागामार्फत खालील शिष्यवृत्या देण्यात येतात जे विद्यार्थी एस. सी. / एस. टी./ एन. टी./ ओ. बी. सी./ एस. बी. सी. या प्रवर्गातील असतील त्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो.

अधिक माहितीसाठी www.mahadbtmahait या वेब वर Aple Sarkar या वेबसाईट वर Login करून सवलतीचा लाभ घ्यावा. शिष्यवृत्ती करीत एस. सी. / एस. टी./ एन. टी./ ओ. बी. सी./ एस. बी. सी. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पालकाचे उत्पन्न २,००,०००/- पेक्षा कमी असावे. फ्री शिप साठी उत्पन्न मर्यादा १,००,०००/- वर असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येतो. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्ष पासून

आधार क्रमांक असल्या शिवाय शिष्यवृत्तीचा फॉर्म भरता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**टिप –** विद्यार्थी नापास असल्यास किंवा समकक्ष कोर्ससाठी प्रवेश घेतला असल्यास तो विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र ठरत नाही. एकाच कुटुंबातील अधिक मुलांना हि शिष्यवृत्ती मिळत नाही. महाराष्ट्र शासनाची राजर्षी छ. शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना लागु असलेने विद्यार्थ्यांनी शासनाच्या www.mahadbtmahait या वेब वर Aple Sarkar या वेबसाईटवर Login करून सवलतीचा लाभ घ्यावा.

## ❖ अपंग शिष्यवृत्ती

अस्थिव्यंगामुळे अपंग झालेल्या विद्यार्थिनींना सदर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. परीक्षेत किमान ४०% गुण असले पाहिजे. अशा विद्यार्थिनींना अपंग शिष्यवृत्ती साठी अर्ज करता येतो. विशिष्ट नमुन्यातील अर्ज, व्यंग स्पष्ट दिसेल असा फोटो, जन्मतारखेचा दाखला, पालकांचा उत्पन्नाचा दाखला, इ. १२ वी परीक्षेची गुणपत्रांची सत्यप्रत, जिल्हा शल्य चिकित्सकांचे मेडिकल सर्टिफिकेट या बाबींची पूर्तता करावी लागते.

## ❖ राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (National Merit Scholarship)

प्रत्येक प्रतिमासी ५०/– रुपयांच्या काही शिष्यवृत्ती भारत सरकारकडून दिल्या जातात. माध्यमिक शालांत परीक्षेत एकंदर ७५% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थीनी या शिष्यवृत्ती साठी आवेदनपत्र भरण्यास पात्र आहेत.

## ❖ राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती

इ. १२ वी त किमान ८०% पेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थिनीची संबंधित खात्यामार्फत परस्पर निवड केली जाते. साधारण ऑगस्ट महिन्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी व अर्ज संबंधित विद्यार्थी ज्या हायस्कुल च्या किंवा कॉलेज मधून एच एस सी पास झालेला असेल त्या हायस्कुल किंवा कॉलेज मधून कॉलेजकडे आलेले असतात. त्याकरिता विद्यार्थ्यांच्या वडिलांचे वार्षिक उत्पन्न रु. २५०००/– पेक्षा कमी असावे लागते. वडील नोकरी करत असल्यास संपूर्ण पगाराचे उत्पन्न विचारात घेतले जाते. ही शिष्यवृत्ती स्विकारल्यानंतर अन्य कोणतीही शिष्यवृत्ती स्विकारता येत नाही. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, इ. १२ वी गुणपत्रकाची सत्यप्रत, इ. या शिष्यवृत्ती साठी मा. नोटरी पब्लिक यांचा सही व शिक्का असणे अनिवार्य आहे. ही शिष्यवृत्ती पदवी अभ्यासक्रम पर्यंत मिळते.

**स्कॉलरशिप चा अर्ज पूर्णपणे भरून देणे आहे व त्यासाठी लागणारी पूर्तता.**

१. विद्यार्थ्यांचा स्वतःचा जातीचा दाखल तहसीलदारांच्या सही शिक्क्यानिशी असणे आवश्यक आहे.

२. वडिलांच्या महिला आर्थिक वर्षातील उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांच्या सही शिक्क्यानिशी असणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती अर्जावर फोटो लागतो.

४. मागील परीक्षेच्या गुणतक्त्यातील सत्यप्रत अर्जास जोडणे आवश्यक आहे.

५. शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थिनीची महाविद्यालयातील उपास्थीतीत ८० % इतकी असणे बंधनकारक आहे.

६. शिष्यवृत्ती संबंधातील वेळोवेळी लावलेल्या नोटीस, परिपत्रके इ. काळजीपूर्वक वाचाव्यात व त्याप्रमाणे पूर्तता करावी. वेळेत कागरपत्रांची पूर्तता न केल्यास त्यास विद्यार्थिनी स्वतः जबाबदार असेल.

७. स्कॉलरशिप मिळण्यासाठीच्या अर्जाची पूर्तता प्रवेश अर्ज भारलेपासून १५ दिवसाच्या आत करणे आवश्यक आहे.

## Program, Courses & Opportunities (अभ्यासक्रम, शैक्षणिक कोर्सेस आणि संधी)

| अ.नं. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश मर्यादा | पात्रता | कालावधी | नोकरीच्या संधी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **BSc. IT** Bachelor of Science (Info. Tech.) | 60 | १२ वी उत्तीर्ण (विज्ञान शाखा) | ४ वर्जे | नेटवर्क इंजीनियर, आय. टी. कन्सल्टंट, वेब डिझायनर, सॉफ्टवेअर सारख्या क्षेत्रात संधी. |
| 2. | **BCA** Bachelor of Computer Appli$^{n}$. | 60 | १२ वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा) | ४ वर्जे | वेब डिझायनर व सॉफ्टवेअर,प्रोग्रामर, सिस्टम इंजीनियर, इ. सारख्या आय. टी. क्षेत्रात नोकरीच्या संधी. |
| 3. | **B.A.M.M.** Bachelor of Mass Media | 120 | १२ वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा) | ४ वर्जे | माध्यम क्षेत्रात उदा. वर्तमानपत्र, रेडिओ,टि.व्ही. यासोबतच नवनवीन माध्यमांमध्ये लाखो नोकरीच्या संधी. |
| 4 | **BSc. Micro** Bachelor of Science in Microbiology | 120 | १२ वी उत्तीर्ण (विज्ञान शाखा) | ४ वर्जे | विज्ञान शाखेतील या पदवीतून पुढे कोणत्याही क्षेत्रात काम करता येते. रिसर्च स्टुडन्ट आणि वेगवेगळे स्पेशालिस्ट म्हणून काम करण्याची संधी. |
| 5. | **BSc. H.S.** Food Science & Nutrition | 120 | १२ वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा) | ४ वर्जे | फिटनेस ट्रेनर, फूड रिसर्च एनालिस्ट, फूड सर्व्हिस मॅनेजर, फूड टेक्नोलॉजिस्ट, न्यूट्रीशियन व डायटिशियन, इ. सारख्या शासकीय व अशासकीय नोकरीच्या संधी. |
| 6. | MSc. Computer Science | 60 | BSc. Physics, Math's, BCA, BE (Any stream) | २ वर्षे | सॉफ्टवेअर डेव्हलपर, डेटा सायंटिस्ट, सॉफ्टवेअर टेस्टिंग इंजीनियर, आय. टी. सिक्युरिटी स्पेशालिस्ट सारख्या संधी. |
| 7. | MSc. Microbiology, Analytical Chem. | 60 | BSc. ( Chemistry, Biology, Microbiology) | २ वर्षे | माइक्रोबायोलॉजिस्ट, क्लिनिकल रिसर्च असोसिएट्स, मेडिकल कोडर, लेक्चरर, संशोधक, क्वालिटी कंट्रोल, एक्सिक्युटीव्ह, केमिस्ट, इ. |

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची/आवश्यक असणारी कागदपत्रे

| | |
|---|---|
| १. प्रवेश अर्ज | २. १० वी चे गुणपत्रक |
| ३. १२ वी चे गुणपत्रक | ४. शाळा सोडलेचा दाखला |
| ५. Domicile Certificate | ६. उत्पन्नाचा दाखला |
| ७. Cast Certificate (Optional) | ८. Gap Certificate (गॅप असल्यास) |
| ९. आधार कार्ड झेरॉक्स | १०. Migration Certificate असेल तर |
| ११. रेशनकार्ड झेरॉक्स | १२. Graduation Mark sheet for BSc. |
| १३. Photo ३ | १४. वसतिगृह प्रवेश अर्ज (Optional) |
| १५. कॉलेज बस अर्ज (Optional) | |

## महाविद्यालयातील विविध समित्या

| | |
|---|---|
| NAAC Committee | College Development Committee |
| Academic Planning Board | Environment Committee |
| Internal Quality Assurance Cell | Examination Committee |
| Anti-ragging Committee | Canteen Committee |
| Vishakha Committee | Student Grievance Committee |
| Event Management Committee | Feedback Committee |
| NSS Committee | Administration Committee |
| Cultural Committee | Public Relations Committee |
| Health Committee | Sports Committee |
| Library Committee | Alumni Committee |
| Magazine Committee | Timetable Committee |
| Placement Committee | Admission Committee |

# विद्यार्थिनी मंडळ (Students Council)

| S N | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Miss Akshata K. Bhosale | President |
| 2 | Miss Pooja R. Chiturkar | Member |
| 3 | Mr. Vaibhav B. Kumbhar | Member |
| 4 | Mr. Santosh L. Farakate | Member |
| 5 | Miss Rutuja S. Patil | Member |
| 6 | Miss Chinmayi S. Mengane | Member |
| 7 | Miss Tejaswini S. Palkar | Member |
| 8 | Miss Nikita A. Kamble | Member |
| 9 | Miss Sakshi S. Patil | Member |
| 10 | Miss Vaishnavi R. Malvekar | Member |
| 11 | Miss Siddhi S. Salokhe | Member |
| 12 | Miss Namrta M. Patil | Member |
| 13 | Miss Namrata S. Mudhale | Member |
| 14 | Miss Pratiksha P. Londhe | Member |
| 15 | Miss Nandini R. Sitape | Member |
| 16 | Miss Shivani S. Patil. | Member |
| 17 | Miss Utkarsha G. Patil | Member |
| 18 | Miss Sudeshana S. Patil | Member |
| 19 | Miss Pratiksha R. Sankpal | Member |
| 20 | Miss Tejaswini M. Dhundare | Member |
| 21 | Miss Nivedita N. Gurav | Member Secretory |

# महाविद्यालयाची वाहतूक व्यवस्था



महाविद्यालयाकडे १५ बसेसचा ताफा असून, गावातील विविध भाग आणि त्याच्या आजूबाजूच्या भागातून महाविद्यालयात आणि प्रत्येक विद्यार्थीनीला घरी परत जाण्यासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात येण्यासाठी वक्तशीर राहण्यासाठी वाहतूक सुविधेचा लाभ घेणे अपेक्षित आहे.नियमित नियोजित सहलींच्या व्यतिरिक्त, ही सुविधा महाविद्यालयीन तासानंतर प्लेसमेंट आणि प्रशिक्षण, स्थानिक उद्योगांना भेटी, रुग्णालये, N.S.S. शिबिर इत्यादींसाठी वाढवली जाते.

महाविद्यालयीन बस खालील मार्गांवर उपलब्ध आहेत, विद्यमान मार्गांमध्ये नवीन मार्ग/पर्याय करण्याच्या सूचनांचा देखील विचार केला जाईल. कॉलेज बसबद्दल अधिक माहितीसाठी, परिवहन विभाग ९६७३३५३०२६ शी संपर्क साधा.

# वसतिगृह (Hostel)

संस्थेमध्ये मुलींसाठी अत्याधुनिक सुविधा असलेली वसतिगृहे आहेत. एकूण १०० मुलींच्या वसतिगृहात राहण्याची सोय. वसतिगृहांमध्ये वॉटर प्युरिफायरसह वॉटर कूलर, कॉमन टीव्ही रूम, कॉमन रीडिंग रूम इत्यादी सर्व मूलभूत सुविधा पुरवल्या जातात. वसतिगृहांसाठी जेवणाची पुरेशी सोय उपलब्ध आहे.

**वसतिगृह शिस्तीचे नियम**

- ✓ वसतिगृहधारकांनी वसतिगृह नियमांचे पालन करणे आवश्यक. वॉर्डनच्या पूर्व लेखी परवानगीने अपवादात्मक प्रकरणे वगळता कोणत्याही विद्यार्थिनीने रात्रीच्या वेळी तिच्या खोलीपासून दूर राहू नये. कोणत्याही विद्यार्थिनीला, ज्याला कॅम्पस तात्पुरते किंवा अन्यथा सोडायचे असेल, त्यांनी वॉर्डनची लेखी परवानगी घ्यावी.
- ✓ परवानगीसाठी अर्ज करणारी विद्यार्थिनी यांनी तिच्या इच्छित निर्गमनाची आणि परतीची तारीख आणि वेळ नमूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींना पार्टी करणे, मोठ्याने संगीत वाजवणे, मोठ्याने गाणे, ओरडणे किंवा इतर हॉस्टेलर्सचे लक्ष विचलित होण्याची शक्यता असलेले सर्व प्रकारचे आवाज टाळण्याचा सल्ला दिला जातो.
- ✓ वसतिगृहांमध्ये सर्व प्रकारच्या पाळीव प्राण्यांना मनाई आहे. वसतिगृह परिसरात भटक्या कुत्र्यांना किंवा मांजरींना खायला घालण्याची परवानगी नाही.
- ✓ वसतिगृहाच्या परिसरात कोणत्याही पुरुषाला विद्यार्थिनींना भेटण्याची परवानगी नाही. पालकांनी त्यांच्या वॉर्डसाठी स्थानिक पालकाचे नाव देणे आवश्यक आहे.
- ✓ विद्यार्थ्यांना त्यांच्या वसतिगृहाच्या खोलीत मोठी रोकड किंवा मौल्यवान वस्तू न ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कोणत्याही नुकसानीस संस्था जबाबदार राहणार नाही.
- ✓ थकबाकीदारांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

## Graduate Attributes

| | |
|---|---|
| 1. Patriotism | 2. Subject Knowledge |
| 3. Capacity of Problem Analysis | 4. Communication Skills |
| 5. Sense of Moral & Ethical Values | 6. Individual & Team Work |
| 7. Project Management | 8. Life-Long Learning |
| 9. Awareness of constitutional of Rights & Duties | |
| 10. Willingness to contribute to the sustainable development of the society | |

## NAAC Core Values –

- ✓ **The accreditation framework of NAAC is thus based on five core values**
- ✓ Contributing to National Development
- ✓ Fostering Global Competencies among Students
- ✓ Inculcating a Value System among Students
- ✓ Promoting the Use of Technology
- ✓ Quest for Excellence

## Student Charter –

- ✓ **An Institution's Responsibilities towards its Students**
- ✓ Communicate the goals and objectives of the institution systematically and clearly to all students.
- ✓ Offer programmes that are consistent with institutional goals and Objectives.
- ✓ Offer a wide range of programmes with adequate academic flexibility.
- ✓ Use feedback from students in the inititation, review and redesign of programmes.
- ✓ Facilitate effective running of the teaching-learning programmes.
- ✓ Implement a well-conceived plan for monitoring student progress continuously.

- ✓ **Ensure that the student assessment procedures and systems are reliable and valid.**
- ✓ **Provide clear information to students about the admission and completion requirements for all programmes, the fee structure and refund policies,financial aid and student support services.**
- ✓ **Ensure sufficient and well-run support services to all students.**
- ✓ **Promote values, social responsibilities and good citizenry in all students.**

## Students' Responsibilities of Learning

- ✓ **Appreciate the institutional goals and objectives and contribute of their realization by participating in relevant institutional activities.**
- ✓ **Have a clear knowledge of the programmes, admission policies, rules and regulations of the institution.**
- ✓ **Understand the teaching-learning strategies and evaluation systems of the institution.**
- ✓ **Follow the time schedules, rules and regulations of the institution.**
- ✓ **Undertake regular and intense study of learning materials.**
- ✓ **Make optimum use of the learning resources and other support services available in the institution.**
- ✓ **Prepare for continuous internal assignments and term-end examinations.**
- ✓ **Give feedback for system improvement.**
- ✓ **Have faith and ability to pursuer lifelong learning.**
- ✓ **Live as worthy alumni of the institution.**

# राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे, भारत भाग्य विधाता.
पंजाब सिंधु गुजरात मराठा, द्राविड उत्कल बंग.
विंध्य हिमाचल यमुना गंगा, उच्छल जलधी तरंग.
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे.
गाहे तव जयगाथा.
जनगण मंगलदायक जय हे, भारत भाग्य विधाता.
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे.

# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।१।
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचें ।२।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो । जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ।३।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळीं । भेटतु या भूतां ।४।
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।५।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।६।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।७।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।८।
येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।९।

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/